क्रमांक : का.स./बैठक/२०३

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ३ सप्टेंबर, २००३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १ ऑगस्ट, २००३ (शुक्रवार) रोजी झालेल्या २०३ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

शासनाचे मुख्य सचिव - अध्यक्ष
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर - सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे - सदस्य
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री.हरिशंकरन् - सदस्य
व्यवस्थापकीय संचालक,
स्कुलनेट इंडिया लिमिटेड,
आय.एल.अँड एफ.एस.,
वांद्रे-कुर्ला समुह, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.

शासनाचे प्रधान सचिव - सदस्य
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

...२/-

| | | |
|---|---|---|
| महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |
| शासनाचे प्रधान सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,<br>मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको, निर्मल, नरिमन पॉईंट,<br>मुंबई - ४०० ०२३. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण. | - | सदस्य |

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे सचिव (पर्यावरण)
उर्जा व पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेपित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २०३ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १ ऑगस्ट , २००३ (शुक्रवार) |
| वेळ | : | सायंकाळी ४.४५ वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.अजित निंबाळकर<br>शासनाचे मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, | - | सदस्य |
| श्री.अरुण कुमार मागो<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.सुब्रत राठो
अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे),
बृहन्मुंबई महानगरपालिका

डॉ.टी. चंद्रशेखर
प्रकल्प संचालक /अतिरिक्त महानगर आयुक्त

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

**बाब क्र.१ : दिनांक १९ जून, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (२०२ व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक १९ जून, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (२०२ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

**<u>बाब क्र.३</u> : <u>जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचा टप्पा क्र. २ चा सविस्तर अभियांत्रिकी अहवाल तयार करण्याकरीता सल्लागारांची नेमणूक करणे.</u>**

३.१ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे नमूद केले की, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या भाग-१ आणि भाग-३ च्या बांधकामाकरीता मेसर्स एन.सी.सी.मायथस व महावीर जॉईंट व्हेंचर या कंत्राटदाराच्या निविदेस कार्यकारी समितीने या अगोदरच मंजूरी दिली आहे व त्यांना कामाचे आदेश देण्यात आले आहेत. जागतिक बँकेने असे कळविले आहे की, सदर जोडरस्त्याचा भाग-२ (४.५ कि.मि. लांबीचा) सुध्दा सुधारणे व रुंदीकरण करणे आवश्यक आहे ते केल्याशिवाय जोडरस्त्याचे पूर्ण फायदे मिळणार नाहीत. जागतिक बँकेच्या पध्दतीचा अवलंब करुन सदर कामासाठी तांत्रिक आणि वित्तीय प्रस्ताव मागविण्यात आले. त्या प्रस्तावांचे मुल्यमापन केल्यानंतर असे आढळून आले की, मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड यांच्या तांत्रिक आणि वित्तीय देकारांना संयुक्तपणे सर्वात जास्त गुण प्राप्त झाले आहेत. त्याचप्रमाणे त्यांचे वित्तीय देकारसुध्दा सर्वात कमी म्हणजे रु.३४,३४,४००/- इतका आहे. मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड यांनी यापूर्वी या प्रकल्पावर काम केलेले असून भाग-१ आणि भाग-३ करीता सर्वंकष अभियांत्रिकी आराखडे तयार केले आहेत. त्याचप्रमाणे मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड ही संस्था एक सक्षम आणि अनुभवी सल्लागारांची संस्था आहे. जागतिक बँकेने यापूर्वीच, मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड या संस्थेची या कामासाठी सल्लागार म्हणून नेमणूक करण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

३.२ मा. अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदरहू सल्लागाराकडे असलेली कामे व त्यांच्या क्षमतेची खात्री करुन घेऊन त्यांना कामे देण्यात यावी असे निदेश दिले.

३.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केलाः-

<u>ठराव क्र.८८०</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७(३)(ii) व (iii) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या सर्व अधिकारांचा वापर करुन मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरिंग सर्व्हिसेस (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्या नेमणूकीस आणि जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता टप्पा-२ चा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या एकूण रु.३४,३४,४००/- सेवाकरासहित मुल्याच्या अभ्यासास मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वाच्या अधिन राहून सल्लागारांच्या नेमणूकीकरीता आणि अभ्यासाच्या संनियंत्रणासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

## <u>बाब क्र.४</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या मजबूतीकरणाचे कामाच्या निविदेस मंजूरी देणेविषयी.</u>

४.१ महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीमधील सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता याबाबतची संक्षिप्त माहिती विषद केली. त्यांनी पुढे सांगितले की, सदर कामासाठी राष्ट्रीय स्पर्धात्मक देकार (National Competitive Bidding) मागविण्यात आले होते. २२ ठेकेदारांनी निविदाचे कोरे नमुने खरेदी केले होते त्यापैकी पाच निविदाकारांनी त्यांचे देकार वेळेत सादर केले आहेत. मेसर्स पटेल इंजिनिअरींग सर्व्हिसेस हे पात्रतेच्या सर्व अटी पूर्ण करीत असल्यामुळे तसेच त्यांची निविदा सर्वात कमी मुल्याची म्हणजे रु.३४,९८,१३,१४७/- असल्यामुळे मुल्यांकन समितीने मान्यतेसाठी शिफारस केली आहे. त्याचप्रमाणे मेसर्स पटेल इंजिनिअरिंग सर्व्हिसेसच्या नेमणूकीस जागतिक बँकेने ना-हरकत दाखला दिलेला आहे. तसेच मुख्य उड्डाणपूलाच्या भागाच्या

कामाकरिता निविदांच्या बाबत प्रक्रिया सुरु आहे असेही सांगितले. सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी सादर केला आहे.

४.२ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-

<u>ठराव क्र.८८१</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम १९७४ च्या कलम ७(३)(ii) व (iii) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन मेसर्स पटेल इंजिनिअरींग लिमिटेड या निविदाकाराची रु. ३४,९८,१३,१४७/- (रु.चौतिस कोटी अठठयान्नव लाख तेरा हजार एकशे सत्तेचाळीस) या सर्वात कमी मुल्याच्या निविदेस कार्यकारी समिती कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी व पुढील योग्य ती कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : सि.स.नं.१७५ अ/४ (पार्ट) मौजे मजास, अंधेरी (पूर्व) (पुनमनगर) येथे प्रकल्पग्रस्तांसाठी पुनर्वसन सदनिकांचे करण्यात येणारे कायमस्वरुपी बांधकाम - निविदा मंजूरीसाठी.**

५.१ या विषयाची पार्श्वभूमी विषद करताना प्रकल्प संचालक व अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी असे सादर केले की, पुनमनगर येथील सुमारे १९२८४ चौ.मी. क्षेत्रफळाच्या पुनर्वसनासाठी आरक्षित असलेला भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्राधिकरणास हस्तांतरीत केला आहे. या भूखंडावर सुमारे २२५ चौ.फुट क्षेत्रफळाच्या १७१२ सदनिका बांधण्याचा प्रस्ताव आहे. सदर प्रकल्पाचा खर्च ठेकेदाराने बांधकामापोटी मिळणा-या हस्तांतरणीय विकास हक्काच्या (TDR)

मोबदल्यात करणे आहे. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मार्गविण्यात आल्या आहेत. बांधकाम पूर्ण करण्याचा कालावधी एकूण १८ महिन्यांचा आहे. निविदा जागतिक बँकेच्या प्रमाणित निविदेनुसार बनविण्यात आल्या असून त्यामध्ये कामाच्या संदर्भात योग्य ते फेरफार करण्यात आले आहेत. प्रकल्प संचालक व अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, या निविदा सूचनेस प्रतिसाद म्हणून एकूण २० ठेकेदारांनी कोरे निविदा संच खरेदी केले होते, त्यापैकी चार ठेकेदारांनी आपल्या पूर्ण केलेल्या निविदा बंद लिफाफ्यामध्ये दिनांक २३ जून, २००३ रोजी म्हणजे नियोजित वेळी प्राधिकरणास सादर केल्या. या प्रस्तावाप्रमाणे मेसर्स गोलानी ब्रदर्स यांचा देकार सर्वात आकर्षक असून, तो मान्य करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

५.२ अध्यक्ष व मुख्य सचिव यांनी सदरील निवडलेल्या ठेकेदाराने काम अर्धवट सोडू नये तसेच कामाचा दर्जा योग्य राहण्यासाठी निविदेमध्ये पुरेशी तरतूद करण्यात आल्या आहेत अगर कसे याबाबत विचारणा केली असता प्रकल्प संचालक व अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी यावर असे स्पष्ट केले की, निविदेतील शर्तीप्रमाणे निवडलेल्या ठेकेदाराने अनामत रक्कम म्हणून रु.३.४५ कोटी रक्कमेची बँक हमी (बँक गॅरंटी) सादर करावयाची आहे. निविदेतील शर्तीचे उल्लंघन झाल्यास प्राधिकरणास अनामत रक्कम जमा करता येईल. तसेच सदर कामावर देखरेख ठेवण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचीही नेमणूक करण्यात येत आहे असेही स्पष्ट केले.

५.३ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८८२ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७(३)(iii) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती मुंबई नागरी सुविधा प्रकल्पामुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांसाठी मजास गावातील प्लॉट क्र.१७५अ/४ (पार्ट) येथे करण्यात येणारे कायमस्वरुपी

गाळयांच्या बांधकामासाठी मे.गोलानी ब्रदर्स यांची रु.१,११,११,१११/- किंमतीची उच्चतम प्रतियोगी निविदा (Highest Responsive Bid) स्विकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाबाबत योग्य ती कार्यवाही करण्याकरीता प्राधिकरणाचे महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - प्राधिकरणाची व इतर अंमलबजावणी संस्थांचे पर्यावरणीय व्यवस्थापन क्षमता वाढविण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करणेविषयी.**

६.१ प्रकल्प संचालक व अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीबाबत संक्षिप्तमध्ये माहिती देताना सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी जागतिक बँकेने प्रकल्प राबविणा-या संस्थांमध्ये पर्यावरण व्यवस्थापन करण्याची क्षमता वाढविणे साठीचे तांत्रिक सहाय्य पुरविण्याकरीता सल्लागाराची नेमणूक करणे गरजेचे आहे असे सुचविले होते. जागतिक बँकेच्या सुचनेनुसार सल्लागाराची नेमणूक करुन त्यांच्याकडून तांत्रिक सहाय्य घेण्याचे प्राधिकरणाने ठरविले.

६.२ प्रकल्प संचालक व अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, हे तांत्रिक सहाय्य पुरविण्याकरीता योग्य त्या सल्लागाराची निवड करता यावी म्हणून इंडियन एक्सप्रेस व टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रांच्या प्रमुख शहरांतील आवृत्त्यांमध्ये जाहिराती दिल्या होत्या. त्यानुसार प्राधिकरणातर्फे सहा सल्लागार संस्थांची संक्षिप्त सूची बनविण्यात आली होती. सदर संस्थांमार्फत मागविण्यात आलेल्या निविदांचे तांत्रिक व आर्थिक मुल्यांकन प्राधिकरणाने नेमलेल्या मुल्यांकन समितीने केले आहे. सदर समितीच्या तांत्रिक व आर्थिक अहवालास जागतिक बँकेने मान्यता दिलेली आहे. या अहवालामध्ये मेसर्स इ.आर.एम.इंडिया या संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच मूल्यांकन समितीच्या या अहवालामध्ये मेसर्स इ.आर.एम.इंडिया या सल्लागार संस्थेबरोबर जागतिक बँकेच्या धोरणानुसार वाटाघाटी करण्याचे सुचविले होते. त्याप्रमाणे प्राधिकरणाने मेसर्स इ.आर.एम.इंडिया या संस्थेबरोबर

वाटाघाटी केल्या व त्याचा अहवालसुध्दा जागतिक बँकेने मान्य केला. तसेच जागतिक बँकेने कंत्राटाचा मसुदा सुध्दा मान्य केलेला आहे. या तांत्रिक सहाय्यासाठी मेसर्स इ.आर.एम.इंडिया या सल्लागार संस्थेला रु.८६,५२,०००/- + ८% सेवा कर इतका खर्च येणार आहे.

६.३ प्रकल्प संचालक व अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी सदरहू प्रकल्पास लागणा-या निधीपैकी ८०% निधी जागतिक बँकेकडून कर्जरुपाने मिळणार असून उर्वरित २०% निधी संबंधित कार्यान्वयन संस्थांकडून वसूल करणार असल्याचे सांगितले.

६.४ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८८३ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम ३(२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन कार्यकारी समितीतर्फे प्राधिकरण व इतर कार्यान्वयन संस्थांना तांत्रिक सहाय्य पुरविण्याकरीता मेसर्स इ.आर.एम.इंडिया या सल्लागार संस्थेस रु.८६,५२,०००/- + ८% सेवा कर इतकी रक्कम देऊन नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाद्वारे इतर कार्यान्वयीन संस्थांना तांत्रिक सहाय्य पुरविण्याबाबतच्या प्रकल्पाच्या यशस्वीरित्या अंमलबजावणीकरीता प्राधिकरणाच्या महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील पदांचा आढावा घेण्याबाबत.

७.१ महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, शासनाच्या नगर विकास विभागाने कळविले आहे की, या प्राधिकरणातील पदांचा आढावा घ्यावा व प्राधिकरणाच्या कामकाजाच्या तुलनेत

सध्या कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचारी अतिरिक्त आहेत किंवा कसे ही बाब राष्ट्रीय उत्पादकता परिषद (National Productivity Council), भारत सरकार यांच्या सारख्या तज्ञ यंत्रणेकडून तपासून घ्यावी. तसेच शासनाच्या दिनांक १६ जून, २००३ च्या निर्णयानुसार सर्व उपक्रमांनी त्यांच्या आस्थापनेवरील पदांचा आढावा घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय उत्पादकता परिषद, मुंबई यांना या अभ्यासाचे काम देण्यासंबंधीचा प्रस्ताव यापूर्वी कार्यकारी समितीस सादर केला होता. तथापि, वेळेअभावी या बाब टिप्पणीवर चर्चा होऊ शकली नाही. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, प्राधिकरणातील कर्मचारीवृन्दांचा आकृतीबंध व मनुष्यबळाची उत्पादकता यात सुधारणा करण्यासाठी या अभ्यासाचा उपयोग होईल. तसेच प्राधिकरणातील व्यपगत झालेल्या पदांचे पुनरुज्जीवन करण्यासाठीही या अभ्यासाची मदत होईल.

७.२ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८८४</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७(३)(i) व (iii) नुसार कार्यकारी समितीला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे, राष्ट्रीय उत्पादकता परिषदेद्वारे (National Productivity Council) प्राधिकरणातील कर्मचारीवृन्दाचा आकृतीबंध व मनुष्यबळाची उत्पादकता यासंबंधीचे अभ्यासकार्य हाती घेण्यास व या अभ्यासकार्यासाठी येणा-या खर्चास (अंदाजे रु.८.१ लाख + ८% सेवाआकार + स्थानिक प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती) कार्यकारी समिती मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासंबंधात पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.८ : **बृहन्मुंबईच्या 'सी' वॉर्डातील भूलेश्वर भागातील अनधिकृत जडजवाहिर बनविणा-या कारखान्यामुळे होणा-या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी सल्लागार नियुक्त करण्याचा प्रस्ताव.**

८.१ प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांनी या विषयाची पार्श्वभूमी विषद केली. 'सी' वॉर्डातील भुलेश्वर भागाच्या रहिवाशी विभागातील जडजवाहिरांच्या अनधिकृत कारखान्यांमुळे आगीचा धोका, हवा आणि ध्वनी प्रदुषण, तसेच काही सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २००२ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत या समस्यांचा सखोल अभ्यास करुन दिर्घकालीन उपाययोजना तयार करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले होते. त्यानुसार नगर विकास विभागाने त्यांच्या दिनांक २२ नोव्हेंबर, २००२ च्या पत्रानुसार असा अभ्यास प्राधिकरणाने हाती घेण्याबाबत निर्देश दिले.

८.२ प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, हया समस्या संपूर्णतया बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील आहेत. कारण त्यामध्ये प्रदुषण नियंत्रण, मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ ची अमंलबजावणी आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या तरतुदीखाली रहिवाशी विभागातील Non-conforming वापरांना प्रतिबंध या बाबींचा समावेश होतो. तसेच त्यांनी पुढे असे सांगितले की, महापालिका आयुक्तांनी जडजवाहिरांच्या अशा अनधिकृत कारखान्यांचे महापालिकेच्या मोकळया आणि वापरात नसलेल्या औद्योगिक गाळयांमध्ये व बाजारपेठेत स्थलांतर करण्याची शक्यता पडताळून पाहण्याबाबत सहाय्यक महापालिका आयुक्त (इस्टेट) यांना निर्देश दिले आहेत.

८.३ बाब टिप्पणीमध्ये, सदर अभ्यास करण्यासाठी लागणारी कार्यकक्षा (Terms of Reference) व सल्लागार निवडण्याच्या कार्यपध्दतीचा समावेश आहे.

८.४ वरील बाबींचा विचार करता सदस्यांचे असे ठरले की, या अभ्यासाच्या शिफारशींची अंमलबजावणी बृहन्मुंबई महापालिकेने करावयाची असल्याने तसा अभ्यास महापालिकेने त्यांना

आवश्यक वाटल्यास करणे अधिक उचित होईल. शासनाच्या नगर विकास विभागास वरील बाबी स्पष्ट करुन याबाबत त्यांनी प्राधिकरणास दिलेल्या निर्देशाचा पुनर्विचार करण्याची विनंती करावी.

**बाब क्र.९ : निधी प्रवाह तक्ता. (Fund Flow Statement) सन २००३-०४ ते २००६-०७**

९.१ मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी निधी प्रवाह तक्ता बाबत संक्षिप्त माहिती दिली व पुढे सांगितले की, निधी प्रवाह तक्ता तयार करतेवेळी प्राधिकरणाकडे असलेली बँकेतील गुंतवणूक रु.१४४४ कोटी (जून,२००३) विचारात घेण्यात आलेली आहे. तसेच पुढील ४ वर्षात जमिन विक्रीतून प्राधिकरणास रु.२४० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे, ठेवीवरील व्याज व हया पूर्वी ठेवलेल्या कर्जाची परतफेड इ. मधुन सुमारे रु.९२२.२६ कोटी रक्कम प्राधिकरणास अपेक्षित आहे. प्राधिकरणास मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता सुमारे रु.१७७३.५९ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे प्राधिकरण राबवित असलेले विविध प्रकल्प उदा. वांद्रे-कुर्ला संकुल, ओशिवरा, वडाळा ट्रक टर्मिनल यांचा विकास, विविध स्थानिक संस्थांना मुलभूत सोयी पुरविण्यासाठी देण्यात येणारे कर्ज व प्रशासनावरील / आस्थापनावरील खर्च यासाठी पुढील चार वर्षामध्ये असा अंदाजित एकूण खर्च रु.२९५४ कोटी इतका अपेक्षित आहे. बँकेत प्राधिकरणाची असलेली ठेव व विविध मार्गाने पुढील ३ ते ४ वर्षात मिळणारे उत्पन्न अपेक्षित खर्चापेक्षा कमी असल्यामुळे येणा-या काही वर्षात प्राधिकरणास मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे.

९.२ मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी पुढे असेही नमूद केले की, प्राधिकरणाने महाराष्ट्र शासनास तसेच महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ यांच्याकडे ठेवीच्या स्वरुपात निधी दिला आहे, प्राधिकरणास सन २००२-०३ या आर्थिक वर्षापासून आयकर भरावा लागणार आहे. प्राधिकरणास आयकर भरावा लागू नये म्हणून प्राधिकरणाची आयकर कायद्यातील कलम १२(अ) अन्वये "ट्रस्ट" म्हणून नोंदणी करुन घेतली आहे. आयकर कायद्यातील कलम ११(५) मधील तरतुदीनुसारच हयापुढे अतिरिक्त निधीची

गुंतवणूक प्राधिकरणास करावी लागणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनकडील तसेच महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाकडील ठेवी तातडीने परत मिळणे आवश्यक आहे अथवा आयकर विभागाकडून यावर आक्षेप येण्याची शक्यता आहे.

९.३ शासनाकडे / सार्वजनिक उपक्रमाकडे गुंतविलेला निधी व्याजासह परत न मिळाल्यास प्राधिकरणास मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प तसेच इतर प्रकल्पांची अंमलबजावणी करणे प्राधिकरणास शक्य होणार नाही असेही मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी सादर केले.

९.४ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य यांनी सांगितले की, प्राधिकरणाची स्थापना स्वतंत्र कायद्याखाली झाली असल्यामुळे सार्वजनिक उपक्रमासाठी निर्गमित केलेले शासन निर्णय प्राधिकरणास लागू होत नाही तसेच शासनाने प्राधिकरणास सार्वजनिक उपक्रमाच्या यादीतून वगळण्यात यावे असेही मत प्रदर्शित केले. मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी असे सांगितले की, प्राधिकरणास सार्वजनिक उपक्रमांच्या यादीतून वगळण्यासाठी तसेच राष्ट्रीयकृत बँकांबरोबर व्यापारी / वित्त संस्थेमध्ये काही प्रमाणात निधी गुंतविण्यासाठी शासनाने परवानगी द्यावी यासाठी कार्यकारी समितीच्या या अगोदर झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार शासनास विनंती करण्यात आली होती. सदर बाब शासनाकडे प्रलंबित आहे. मा.अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर बाबीवर पुन्हा शासनाकडे प्रस्ताव पाठवावा असे निर्देश दिले.

९.५ प्राधिकरणास कायमस्वरुपी निधी मिळण्याबाबतच्या प्रस्तावावर सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. सदरहू चर्चेनंतर बाब टिप्पणीत सुचविण्यात आलेल्या क्र. ६,७,८, व ९ मधील प्रस्तावावर सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. जेणेकरुन प्राधिकरणाच्या उत्पन्नामध्ये कायमस्वरुपी वाढ होऊ शकेल, तसेच सुचविण्यात आलेले प्रस्ताव हे अस्तित्वात असलेल्या अधिनियमाच्या अनुषंगाने सर्व बाजूंनी पडताळणे तसेच विधी विषयक बाबी तपासणे आवश्यक आहे व त्यासाठी एखाद्या सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे असे समितीने मत प्रदर्शित केले.

९.६ वरील सर्व बाबीवर विचार झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील निर्णय घेतले :

१) . निधी प्रवाह तक्ता २००३-०४ ते २००६-०७ पर्यंतची नोंद घेतली.

२) शासनाकडे / सार्वजनिक संस्थेकडील ठेवी परत मिळण्यासाठी प्राधिकरणाने पाठपुरावा करावा महानगर आयुक्त यांनी सिडकोकडील ठेवी परत मिळण्यासाठी त्यांच्याबरोबर चर्चा करावी.

३) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प, मेगासिटी प्रकल्प व इतर योजनेसाठी शासनाकडून मान्य करण्यात आलेला निधी मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

४) वांद्रे-कुर्ला संकुल व वडाळा भारवाहक तळ येथील जागा-वापर आराखडयाचा (Land Use Plan) पुन्हा आढावा घेण्यात यावा, त्यामुळे प्राधिकरणाला जमिनीच्या विक्रीतून अधिक उत्पन्न मिळू शकेल.

५) प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी व्यापारी बँकेत, वित्तीय संस्थेत गुंतविण्यासाठी पुन्हा एकदा शासनास विनंती करण्यात यावी. त्यामुळे प्राधिकरणाला व्याजातून अधिक उत्पन्न मिळेल.

६) मुंबई नागरी मुलभूत सुविधा प्रकल्पांवर प्राधिकरणाकडून मोठया प्रमाणात खर्च करण्यात येणार असल्यामुळे ज्या विभागामध्ये सोयी उपलब्ध करुन देण्यात येतील त्या विभागातून / भागातून बृहन्मुंबई महानगरपालिकेस विविध करापोटी मिळणा-या एकूण रक्कमेपैकी ५% रक्कम प्राधिकरणास मिळेल.

७) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वाणिज्यिक प्रकल्पास पथ-कर (Toll-Tax) लावण्यासाठी प्राधिकरणाने शासनाकडून परवानगी मिळवावी.

८) वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये एक्झीबिशन सेंटर / शॉपिंग कॉम्प्लेक्स, करमणूक केंद्र, व्यापारी संकुल (Business Centre), खाजगी उद्योजकांच्या मदतीने बांधणे जेणेकरुन प्राधिकरणास कायमस्वरुपी उत्पन्न मिळेल.

९) वांद्रे-कुर्ला संकुलात उपलब्ध असलेल्या जमीन-विक्रीतून जास्तीत जास्त उत्पन्न मिळण्यासाठी विशेष प्रयत्न व पणन धोरण तयार करावे.

१०) प्राधिकरणाने या अगोदर मंजूर केलेल्या कर्जाचा पुन्हा एकदा आढावा घेऊन प्राधान्य असलेल्या प्रकल्पांस अर्थसहाय्य करावे. प्राधिकरणाने फक्त अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार प्रकल्पावर खर्च करावा. प्रकल्पासाठी देण्यात येणारे अनुदान यावर काही प्रमाणात प्राधिकरणास मर्यादा ठेवावी. त्याचप्रमाणे अभ्यास/सर्वेक्षण यावर अर्थसंकल्पातील तरतूदीवरच खर्च करण्यात यावा.

९.७ कार्यकारी समितीने वरील घेतलेले निर्णय क्र.२,३,४,५ व १० वर प्राधिकरणाने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच प्राधिकरणास कायमस्वरुपी उत्पन्न मिळण्यासाठी निर्णय क्र.६,७,८ व ९ ची अंमलबजावणी करण्याकरीता प्राधिकरणाने सल्लागारांची नेमणूक करावी.

**बाव क्र.१० : प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - १ जून, २००३ ते १५ जुलै, २००३**

प्राधिकरणाकडील १ जून, २००३ ते १५ जुलै, २००३ पर्यंतच्या असलेल्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**बाव क्र.११ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूकीबाबत.**

११.१ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी बाब टिप्पणीबाबत माहिती देताना असे प्रतिपादन केले की, मिठी नदी ते अमर महल जंक्शन पर्यंत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या व्यवस्थापनाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड करणे अत्यंत गरजेचे आहे. सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या भाग-१ करीता यापूर्वीच कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली असून त्या कंत्राटदारावर योग्य ते पर्यवेक्षण आणि संनियंत्रण करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणे अत्यंत आवश्यक आहे. जागतिक बँकेच्या पध्दतीनुसार व संक्षिप्त सूचीमधून सहा सल्लागारांकडून देकारांचे प्रस्ताव मागविण्यात आले. पाच सल्लागारांनी तांत्रिक आणि वित्तीय देकारांचे प्रस्ताव सादर केले. पाच सल्लागारांपैकी तीन सल्लागारांना तांत्रिक मुल्यमापनात ७५ पेक्षा अधिक गुण प्राप्त केले असल्यामुळे त्यांचे वित्तीय देकारांचे प्रस्ताव

उघडण्यात आले. प्रस्तावांचे मुल्यमापन जागतिक बँकेने ठरवून दिलेल्या परिक्षणाच्या कसोटयांनुसार करण्यात आले. संयुक्त राष्ट्र अमेरिकेचे मेसर्स लुईस बर्गर आंतरराष्ट्रीय महामंडळ (M/s. Louis Berger Inc., USA) यांना एकत्रितरित्या (Combined score) ८३.८९ इतके गुण प्राप्त झाले. त्यामुळे त्यांना प्रथम पसंती क्रमांक देण्यात आला. मेसर्स लुईस बर्गर यांनी रु.४,२४,५७,६२५/- + सेवा कर इतक्या मुल्याची निविदा सादर केलेली आहे. जागतिक बँकेने मुल्यमापन अहवालास मंजूरी दिली असून संयुक्त राष्ट्र अमेरिकेचे मेसर्स लुईस बर्गर यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्याची शिफारस केलेली आहे.

११.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८८५</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७(३)(ii) व (iii) व याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग-१ व २ च्या प्रकल्प व्यवस्थापन आणि पर्यवेक्षणाकरीता संयुक्त राष्ट्र अमेरिकेतील मेसर्स लुईस बर्गर आंतरराष्ट्रीय महामंडळ (M/s. Louis Berger Inc., USA) यांच्या नेमणूकीस एकूण रु.४,२४,५७,६२५/- + सेवा कर यासहित मुल्याच्या देकारास मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सल्लागारांच्या नेमणूकीकरिता आणि अभ्यासाच्या संनियंत्रणासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्याकरिता महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

—— oooooooooo ——